हिंदु संघटन आणि हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कार्यरत
# हिंदु जनजागृति समिति
नोंदणी क्र. : 1540/I-634, १२.११.२००२, फोंडा, गोवा.

भ्रमणध्वनी
९३२६१०३२७८
ई-मेल
contact@HinduJagruti.org
संकेतस्थळ
www.HinduJagruti.org

नोंदणीकृत कार्यालय : 'मधु स्मृति', घर क्र. ४५७, पहिला मजला, बैठक सभागृह, सत्यनारायण मंदिराजवळ, ढवळी, फोंडा, गोवा ४०३ ४०१.

।। जयतु जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।

दिनांक : २२.१.२०१५

प्रति,
मा. संपादक / मुख्य पत्रकार,
..............................

**कृपया प्रसिद्धीसाठी**

'पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती'त कोट्यवधी रुपयांचा घोटाळा; राज्यव्यापी आंदोलनाला आरंभ

# घोटाळ्याची सीबीआय चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करा आणि मंदिरे शासनमुक्त करून भक्तांच्या ताब्यात द्या ! – हिंदु जनजागृती समितीची मागणी

मुंबई – साडेतीन शक्तीपिठांपैकी एक असलेले श्री महालक्ष्मी मंदिर, कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्री जोतिबा देवालय यांसह कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग, ठाणे, रायगड आणि पुणे या जिल्ह्यांमधील ३०६७ देवस्थाने ज्या 'पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती' कह्यात आहेत, त्या समितीने देवस्थानच्या व्यवस्थापनात आणि कारभारात प्रचंड घोटाळे केल्याचे आज हिंदू विधिज्ञ परिषद आणि हिंदु जनजागृती समिती यांनी पुराव्यांसह उघड केले. हिंदू विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष व मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता श्री. वीरेंद्र इचलकरंजीकर यांनी माहितीच्या अधिकारातील ही सर्व माहिती उघड केली. देवस्थानातील हे घोटाळे, भ्रष्टाचार अत्यंत गंभीर असून या प्रकरणी देवस्थान समिती तात्काळ शासनमुक्त करून भ्रष्टाचाऱ्यांना कठोर शासन करावे. या प्रकरणी हिंदु जनजागृती समितीने राज्यव्यापी आंदोलन छेडले असून त्याचा आरंभ १५ जानेवारी २०१५ या दिवशी सर्व हिंदुत्ववादी, भाविक आणि जिज्ञासू यांच्या वतीने श्री महालक्ष्मी मंदिरात देवीला साकडे घालून करण्यात आला. हे राज्यव्यापी आंदोलन 'राष्ट्रीय हिंदु आंदोलन' या नावाने सर्व हिंदुत्ववादी संघटनांना एकत्र घेऊन मुंबई, ठाणे, रायगड, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, जळगाव, धुळे, यवतमाळ, वर्धा आदी जिल्ह्यांत करण्यात येणार आहे. तसेच २ फेब्रुवारी यादिवशी कोल्हापूर येथे भव्य आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनांमध्ये सर्व समविचारी संघटना आणि भक्तांनी सहभागी व्हावे, असे आवाहन हिंदू जनजागृती समितीचे महाराष्ट्र राज्य प्रवक्ते श्री. अरविंद पानसरे यांनी पत्रकार परिषदेत केले. या वेळी सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. संदीप शिंदे आणि अखिल भारतीय वीरशैव लिंगायत महासंघाचे डॉ. विजय जंगम (स्वामी) हेही उपस्थित होते.

## देवस्थान समितीमधील घोटाळे

वर्ष १९६९ पासून सन २००४ या सालापर्यंतचे ३५ वर्षांपर्यंतचे लेखापरीक्षण झालेले नाही. सन २००४ सालानंतर एकत्र लेखापरीक्षण करण्यात आले, तर त्यापुढेही अशाच पद्धतीने पुढल्या वर्षांमध्ये २००५ ते २००७ पर्यंतचे एकत्र लेखापरीक्षण करण्यात आले. वर्ष २००८ पासून पुढचे लेखापरीक्षण अजूनही पूर्ण करण्यात आलेले नाही. श्री महालक्ष्मी देवस्थान आणि केदारलिंग देवस्थान सोडून प्रत्येक देवस्थानचे दागदागिने किती आहेत ? त्यांचे मूल्य किती आहे ? याविषयी समितीकडे कोणतीही नोंदणीवहीच (रजिस्टर) नाही. समिती स्थापन होण्याच्या काळातील एक

नोंदवही होती; मात्र त्यानंतरच्या काळात किती वाढ झाली ? दागिन्यांची काय विल्हेवाट लावली, याबाबत कोणताच तपशील देवस्थान समितीकडे नाही. याचा अर्थ या बाबींकडे समितीने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे, असे दिसून येते. अनेकदा भाविक अर्पण पेटी /मदत पेटीमध्ये रोख रकमेशिवाय दागिनेही टाकतात. अशा दागिन्यांची नोंद घेणे बंधनकारक आहे, तरी त्याची नोंदच घेतली नाही, अशीही गंभीर बाब लेखापरीक्षकांनी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या तपासणीत दाखवूनही त्यावर उपाययोजना करण्याऐवजी त्याला केराची टोपली दाखवण्यात आली.

## देवस्थानांच्या जमिनींमध्येही मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीकडे २००९-१० च्या पुराव्यांनुसार किमान २३००० ते २५००० एकर जमीन असतांना २०१३ मध्ये ती ६७७७ हेक्टर १९ आर (म्हणजेच साधारण १६ हजार ९६१ एकर) इतकी झाली. उर्वरित ७ हजार एकर जमिनीचे काय झाले ? याचा अर्थ काय निघतो ? अनेक ठिकाणी इमारती आहेत, वृक्षसंपत्ती आहे. या जमिनी अनेक ठिकाणी भाड्याने दिलेल्या आहेत; परंतु त्यांच्यातून किती भाडे आले पाहिजे, त्याची नोंदवही नाही.

## अन्य काही गंभीर त्रुटी

देवस्थान समितीच्या जमिनींपैकी काही जमिनींवर खाणकाम (माईनिंग) होते; मात्र त्याचा मोबदला (रॉयल्टी) देवस्थानला मिळत नाही. लेखापरीक्षकांच्या अंदाजानुसार वर्ष २००७ मध्येच मोबदल्याची (रॉयल्टी) येणे रक्कम २ ते ३ कोटीं रुपयांच्या घरात होती. १९८५ पासून ही खाणकामे चालत असूनसुद्धा देवस्थानला मोबदला (रॉयल्टी) मिळत नाही. खाणकामाची अनुमती कोणी दिली, हे शासनाला माहीत नाही. शासनाच्या अनुमतीशिवायच हे खाणकाम चालू झाले आहे. यावरून हा हजारो कोटीं रुपयांचा घोटाळा असण्याची शक्यता आहे. या समितीत राजकीय पक्ष आणि राजकारण्यांचे बगलबच्चे घुसवण्यात आले. त्यामुळे देवस्थान समितीतील भ्रष्टाचार वाढत गेला. विशेष म्हणजे देवस्थान समितीच्या अपहाराची माहिती असूनही काँग्रेस आघाडी शासनाने भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालून जनतेचा घोर विश्वासघात केला आहे. असे घोटाळे कोणत्याही मंदिरात होऊ नयेत, म्हणून वेगळे कायदे करून मंदिरे भक्तांच्या ताब्यात द्यावीत. जेणेकरून ती हिंदू धर्माची खऱ्या अर्थाने स्फुरणकेंद्रे बनतील, ही भाजप-शिवसेना यांच्या शासनाकडून रास्त अपेक्षा आहे. या प्रकरणी लवकरच आम्ही भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाचे जनक श्री. अण्णा हजारे यांचीही भेट घेणार असून त्यांनाही या आंदोलनात सहभागी होण्याची विनंती करणार आहोत.

## आमच्या प्रमुख मागण्या...

१. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीमधील कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याची चौकशी केंद्रीय अन्वेषण यंत्रणेकडे द्यावी.
२. 'पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती' शासनमुक्त करून भ्रष्टाचाऱ्यांना कठोर शासन करण्यात यावे.

## * जाहीर आवाहन

१. या राज्यव्यापी आंदोलनांना सर्व हिंदुत्ववादी, भाविक आणि जिज्ञासू यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे.
२. 'पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती'मधील भ्रष्टाचाराविषयी वा अन्य कोणतीही माहिती आपल्याकडे असल्यास तीही हिंदु जनजागृती समितीला कळवावी.

आपला नम्र,

श्री. अरविंद पानसरे, प्रवक्ता, महाराष्ट्र राज्य,
हिंदू जनजागृती समिती, संपर्क क्र. ८४५१००६०१४